महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दुरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

जा.क्र. तंशिविकापु/लेखा २/२०२३/ 714 दिनांक 10 FEB 2023

परिपत्रक

प्रति,
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये/तत्सम संस्था,
शासकीय तंत्र निकेतने, पुणे विभाग पुणे.

विषय : -आर्थिक वर्षाच्या अखेरीस खरेदीच्या प्रस्तांवाबाबत करावयाची कार्यवाही.

संदर्भ :-महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०२३/प्र.क्र.७/२३/कोषा.प्रशा.५ दिनांक ०९ फेब्रुवारी २०२३

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय परिपत्रकाचे अवलोकन करावे. परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यानुसार सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षात दिनांक १५ फेब्रुवारी २०२३ तसेच त्यानंतर कोणत्याही खरेदीच्या प्रस्तावांना मंजूरी देवू नये. त्याचप्रमाणे विद्यमान फॅर्निचरची दुरुस्ती,झेरॉक्स मशीन, संगणक उपकरणे अथवा त्यांचे सुट भाग यांच्या दुरूस्तीचे प्रस्ताव, नैमितीक कार्यशाळा, सेमिनार व भाडयाने कार्यालय घेण्याचे प्रस्तावा इ.बाबत प्रस्तावांना मंजूरी देवू नये.

चालू आर्थिक वर्षात कार्यालयाच्या दैनंदिन वापरातील उपभोग्य वस्तुंच्या मर्यादित खरेदीकरीता सदर निर्बंध लागू राहणार नाहीत. तथापी पुढील वर्षात आवश्यक असणा-या वस्तुंची आगाऊ खरेदी करून ठेवता येणार नाही.

सदर आदेश शासनाने उपलब्ध करून दिलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधून करावयाच्या खरेदीकरीता लागू राहतील.

सदर आदेश हे चालू आर्थिक वर्षाकरीता असून दिनांक १५ फेब्रुवारी २०२३ ते ३१ मार्च २०२३ पर्यंत लागू राहतील.

तरी सदर परिपत्रकातील सूचनांचे सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी काटेकोर पालन करावे.

(मा.रा.जाधव)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे.

C:\Users\ropune\Desktop\bhilave.docx